|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

परीक्षा गोपनिय उत्तरार्ध विभाग

---

जा.क्र.कबचौउमवि/७-आय/ ११४४ /२०२६ दि.११/०३/२०२६

**By Speed Post / E-mail**

प्रति,
मा. कुलगुरू / कुलसचिव,
महाराष्ट्रातील सर्व कृषि / अकृषि विद्यापीठे

**विषय :- मे. माऊली ट्रेडिंग कंपनी, मालेगाव यांना पुरवठादारांच्या काळया यादीत (Blacklisted) केल्याबाबत...**

**महोदय / महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यामार्फत विविध परीक्षांमध्ये वापरलेल्या जुन्या उत्तरपत्रिका व संबंधित कार्यालयीन दस्तऐवज यांच्या रद्दी विक्रिसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. सदर प्रकियेनुसार **मे. माऊली ट्रेडिंग कंपनी,** मनमाड चौफुली, चंदनपुरी शिवार, गिरणा ऑटो जवळ, मालेगाव, जि. नाशिक यांना दिनांक २९/११/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आला होता.

सदर कार्यादेशानुसार संबंधित फर्मने अटी व शर्तीनुसार आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित होते. तथापि, विद्यापीठाकडून वारंवार कळवूनही त्यांनी कार्यादेशातील अटी व शर्तीचे पालन केलेले नाही तसेच कार्यवाही करण्यास टाळाटाळ केली आहे. त्यामुळे करारातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आहे.

सदर बाबीचा गंभीरपणे विचार करून विद्यापीठ प्रशासनाने **मे. माऊली ट्रेडिंग कंपनी, मालेगाव** तात्काळ प्रभावाने **काळया यादीत (Blacklisted)** समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संबंधित फर्मशी आपल्या विद्यापीठामार्फत कोणत्याही प्रकारचे व्यवहार / निविदा प्रकिया / कंत्राटी कामकाज करताना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

ही माहीती आपल्या नोंदीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

**(सी.ए. रविंद्र एन. पाटील)**
वित्त व लेखा अधिकारी
कबचौ उमवि, जळगाव

**प्रत :**

१. मा. कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव
२. मा. प्र-कुलगुरू महोदय, कबचौ उमवि, जळगाव
३. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौ उमवि, जळगाव
४. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उमवि, जळगाव
५. मे. माऊली ट्रेडींग कंपनी, मालेगाव